विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या विभागातील शासन मान्यताप्राप्त अनुदानित आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन यामधील कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे अथवा अन्यायांचे निवारण करण्यासाठी करावयाच्या अपील/पुनर्विलोकन अशी अर्धन्यायिक स्वरुपाची व्यवस्था निर्माण करणे.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. विभशा-२०१७/प्र.क्र.२६६/ विजाभज-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दि. ०३ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावना :-

राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी तसेच उसतोड कामगारांच्या मुलांसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, निवासीशाळा, विद्यानिकेतन चालविल्या जात आहेत. शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अटी व शर्ती नुसार ज्या स्वयंसेवी संस्थांमार्फत या आश्रमशाळा चालविण्यात येतात. त्या आश्रमशाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत. प्रचलित नियमानुसार विहित पद्धतीने स्वयंसेवी संस्थांनी नियुक्त केलेल्या पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत मान्यता दिल्या जातात, अशा मान्य कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासनामार्फत १००% खर्च निधीच्या उपलब्धतेनुसार अनुज्ञेय असतो. आश्रमशाळांतील कर्मचारी वृंदाच्या संचमान्यता/नियुक्त्या/वैयक्तिक मान्यता, पदोन्नत्ती, कालबद्ध पदोन्नती, अनुकंपा नियुक्ती, वरीष्ठ वेतनश्रेणी, निवड वेतनश्रेणी, सेवा ज्येष्ठता, मागसवर्गीयांचा अनुशेष, इ. सेवाविषयक बाबीसंबंधी सद्यस्थितीमध्ये अनेक प्रकरणे प्रादेशिक संचालनालय व राज्यस्तरावर प्रलंबित असून मा. उच्च न्यायालयात या विषयी प्रलंबित असलेल्या याचिकांची संख्या सुध्दा मोठ्या प्रमाणावर आहे. सदर याचिकांचा निपटारा व त्यावर योग्य ती न्यायीक कार्यवाही करण्यासाठी शासनाचा वेळ, पैसा व मनुष्यबळाचा वापर होत असल्यामुळे, त्याचा प्रादेशिक संचालनालय व शासनाच्या नियमित कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. शासनाचे दृष्टीने ही बाब निश्चितच भुषणावह नाही. त्यासाठी सदरहू कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधी सद्यस्थितीमध्ये असलेल्या अपिलाचे तरतुदीमध्ये सुधारणा करणे क्रमप्राप्त झालेले आहे.

शासन निर्णय सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्र.विभशा-२००२/ प्रक्र.१३९/ मावक-६, दि.१८/६/२००५ अन्वये विजाभजच्या प्राथमिक आश्रमशाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींचे अपिल दाखल करुन त्यावर निर्णय देण्याचे अधिकार संबंधित विभागीय समाज कल्याण अधिकारी (सद्यस्थितीतील प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण)

यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानंतर कुठल्याही प्रकारची अपील/पुनर्विलोकन करण्याची तरतूद नाही. हे न्यायीकदृष्टया संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे संबंधित संस्थाचालक/संगठन/ कर्मचारी थेट न्यायालयात याचिका दाखल करतात.

या बाबींचा सर्वंकष विचार करुन या विभागाच्या शासनमान्य खाजगी अनुदानित आश्रमशाळा, निवासीशाळा, विद्यानिकेतन यामधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रकारच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात आणि इतर विषयाबाबतील त्यांना प्रशासकीय पातळीवरच न्याय मिळवून देण्याकरिता सक्षम प्राधिकारी यांचेकडे दाद मागण्यासाठी अपिल/पुनर्विलोकन करण्याचे अधिकारात सुधारणा करण्याची व पर्यायाने प्रशासकीय पातळीवरील न्यायालयीन प्रकरणात घट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील शासन मान्यताप्राप्त शासकीय अथवा खाजगी अनुदानित संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा, निवासीशाळा, विद्यानिकेतन यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्व प्रकारच्या सेवाविषयक आणि इतर विषयाबाबीसंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार, निवेदन व इतर बाबी निवारण करण्यासाठी व त्याला न्यायाकरिता दाद मागता यावी, याकरिता सक्षम प्राधिकरणाकडे अपील/पुनर्विलोकन दाखल करण्याची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासनमान्य शासकीय अथवा खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील, निवासीशाळेतील, विद्यानिकेतनातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक आणि इतर कोणत्याही तक्रारींवर दाद मागण्यासाठी त्यांना खालील प्राधिकरणाकडे अपील/पुनर्विलोकन करण्याची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

१. विजाभज आश्रमशाळा, निवासीशाळा अथवा विद्यानिकेतनातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यावर संस्था किंवा संबंधित प्राचार्य अथवा मुख्याध्यापक अथवा संस्थेतर्फे नियुक्त प्राधिकारी यांचेकडून नियमबाहय कारवाई झाल्यास अशा कर्मचाऱ्याने प्रथमत: संबंधित जिल्हयाचे सक्षम प्राधिकारी (सहाय्यक आयुक्त/सहाय्यक संचालक विजाभज /जिल्हा समाजकल्याण अधिकारी) यांचेकडे दाद मागावी. तसेच अशाप्रकारचे निवेदन, तक्रारी किंवा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर संबंधित जिल्हयाचे सक्षम प्राधिकारी (सहाय्यक आयुक्त/सहाय्यक संचालक विजाभज /जिल्हा समाजकल्याण अधिकारी) यांनी ३० दिवसाचे आत निर्णय घेवून आपला निर्णय सर्व संबंधितांना कळवावा.
२. ३० दिवसात निर्णय नाही दिला तर प्रादेशिक उपसंचालक अथवा उप आयुक्त, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचेकडे सरल प्रथम अपील सादर करता येईल. तसेच जर निर्णय दिला असेल तर संबंधित जिल्हयाचे सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशाने संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे/ संस्थाचालक यांचे समाधान न झाल्यास त्यास संबंधित विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अथवा उप आयुक्त, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचेकडे पुढील १५

दिवसात प्रथम अपील दाखल करावे व प्राप्त अपीलावर संबंधित प्रादेशिक उप संचालक अथवा उपायुक्त यांनी ३० दिवसात निर्णय द्यावा.

३. जर ३० दिवसात संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग/ उपसंचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, यांनी निर्णय दिला नाही तर सरळ संचालक, विजाभज, पुणे यांच्याकडे द्वितीय अपील करु शकतील. तसेच जर वेळेवर निर्णय दिला तर प्रादेशिक उपसंचालक/उप आयुक्त यांच्या निर्णयाच्या अनुषंगाने बाधित झालेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे समाधान न झाल्यास त्यांना त्या निर्णयाविरुद्ध संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे, यांचेकडे निर्णयाचे तारखेपासून १५ दिवसांचे आत द्वितीय अपील दाखल करण्याची तरतूद करण्यात येत आहे. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे यांनी सदर अपीलावर नियमानुसार सुनावणी घेऊन अपील प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसात योग्य ती कार्यवाही करुन अपीलावर निर्णय देणे बंधनकारक राहील.

४. जर संचालक, विजाभज, पुणे यांनी ४५ दिवसात निर्णय दिला नाही तर पुनर्विलोकन (Revision) अर्ज/निवेदन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्याकडे करता येईल. तसेच संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे यांनी **द्वितीय अपिलावर** दिलेल्या निर्णयाने बाधित झालेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी/ संस्थाचालक यांचे समाधान न झाल्यास त्यांना त्या निर्णयाविरुद्ध निर्णय दिल्याचे तारखेपासून १५ दिवसांचे आत पुनर्विलोकन (Revision) अर्ज/निवेदन शासनाचे या विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांचेकडे दाखल करता येईल. सदर पुनर्विलोकन अपिलावर ३ महिन्यात निर्णय देण्याचे अधिकार सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहतील.

५. सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयाने संबंधिताचे समाधान न झाल्यास त्या निर्णयाविरुद्ध या विभागाचे मा. मंत्री महोदयांकडे पुनर्निरीक्षण (Review)साठी अर्ज/निवेदन करता येईल व त्यांनी घेतलेला निर्णय अंतीम असेल. संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्याने त्यांना सर्वप्रथम उपलब्ध करुन दिलेल्या व्यवस्थेचा उपयोग करावा. तसेच शक्यतो न्यायालयात याचिका दाखल करण्यापूर्वी वरील नैसर्गिक न्यायतत्वाप्रमाणे केलेल्या अर्ध न्यायिक स्वरुपाच्या तरतुदीचा उपयोग करुन घ्यावा.

३. त्याचप्रमाणे सर्व संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी सदरील आदेश राज्यातील सर्व शासनमान्य खाजगी अनुदानित विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेच्या संस्थांच्या/ संस्थाचालकांच्या आणि संबंधित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाच्या निदर्शनास आणून द्यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१११५०८३६५७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jagdish Prasad Gupta

Digitally signed by Jagdish Prasad Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBC SBCW Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=07a8d74937a2a201dfe74f7433f74c8023ef0586916f2b0eab380ef1f7fd318a, serialNumber=d479600212df4003c56b2461455c25430c04f6f62bf8e0c07200fc49f2331723, cn=Jagdish Prasad Gupta
Date: 2017.10.11 14:58:27 +05'30'

(जे.पी.गुप्ता)

सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४) मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५) सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहाय्यक.
६) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे
७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व)
१२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (सर्व)
१३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४) मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा ....
१५) निवड नस्ती (विजाभज-२).